करोना २०२०/सूचनां/आदेश क्र. - 130

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग
दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१
Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.२८/०३/२०२०

वाचले:- १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-२००५
२) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचनां क्र.करोना २०२०/ प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१३/०३/२०२०
३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, १८९७ ची नियमावली दि.१४/०३/२०२०
४) साथ रोग अधिनियम १८९७
५)मा. जिल्हाधिकारी यांचेकडील करोना २०२०/सूचना/आदेश क्र. ८९ क्र. साशा/कार्या-१/ब-५ /आ.व्य/करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/ २०२० दि. २२/०३/२०२०
६) प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांचेकडील पत्र दि.२६/०३/२०२०

## आदेश

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

शासनाने करोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/०३/२०२० लागू करण्यात आलेला आहे.त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र.२ कडील अधिसूचनां लागू करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने करोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

त्याअर्थी, मी, श्रीमती निधी चौधरी, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी रायगड, मला उपोद्घातातील अ.क्र.१ व ३ कडील नमूद नियमांतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन करोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी पुढील आदेश होई पर्यंत खालील अधिकारी यांची खालीलप्रमाणे जबाबदारी निश्चित करीत आहे. तरी संबंधित अधिकारी यांनी दिलेल्या जबाबदारीच्या अनुषंगाने सर्व कामे पार पाडून मा.विभागीय आयुक्त व मा.जिल्हाधिकारी यांना दैनंदिन अहवाल न चुकता सादर करावयाचा आहे.

| नोडल ऑफीसर | जबाबदार अधिकारी | नेमून दिलेले काम |
|---|---|---|
| १) आयुक्त, पनवेल महानगर पालिका.<br>२) श्री. रविंद्र मठपती, उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय रायगड. जिल्हयाची एकत्रित माहिती मा. श्री. चहल, प्रधान सचिव, नगर विकास यांचेकडे विवरणपत्र १,२,३ नमुन्यामध्ये देणे | १) आयुक्त पनवेल महानगर पालिका<br>२) उपविभागीय अधिकारी सर्व<br>३) तहसिलदार सर्व<br>४) सहा. आयुक्त, पनवेल महानगर पालिका<br>५) गटविकास अधिकारी सर्व<br>६) मुख्याधिकारी नगरपंचायत/ नगरपालिका सर्व. | १) दिनांक १ मार्च २०२० पासून आजमितीपर्यंत परदेशातून कोणत्याही देशातून प्रवास करुन महाराष्ट्र राज्यात आलेल्या भारतीय तसेच परदेशी नागरीका संदर्भात, त्यांच्या राहत्या निवासस्थानी जावून वॉर्डस्तरीय / ग्रामस्तरीय वैद्यकीय पथकाने प्रत्यक्ष भेट देवून तपासणी करुन त्यांचे व त्यांच्या कुटुंबियाचे सर्व्हेक्षण करावे. काही लक्षणे आहेत काय ते विचारावे. लक्षणे आढळल्यास तात्काळ वैद्यकीय पथकास व तहसिलदार यांना कळवावे. जेणेकरुन वैद्यकीय पथक तपासणी करतील.<br>२) वैद्यकीय पथकास प्रत्यक्ष तपासणी करोना विषाणूची लागण झाल्याचे दिसल्यास तात्काळ तालुक्यातील आरोग्य यंत्रणा व तहसिलदार यांना कळवावे. संबधीत व्यक्तीने मागील २५ दिवसात कुठे कुठे व कुणा कुणास भेट दिली ती माहिती जमा करावी. व त्या व्यक्तींची नावे व मोबाईल नंबर तहसिलदार व मनपा क्षेत्रात सहाय्यक आयुक्तांना तात्काळ द्यावीत. |

| | | |
|---|---|---|
| | | ३) दिनांक ०१ मार्च २०२० नंतर राज्यात आलेल्या तथापी इमिग्रेशन विभागाकडून आणि महाराष्ट्र राज्य आरोग्य विभागाच्या Inetergrated disease surveillance programme cell (IDSP) कडून प्राप्त महितीत नमूद केलेल्या पत्त्यावर आढळून न आलेल्या नागरिकांच्या बाबतीत त्यांचे नाव, पत्ता, विदेशातून आल्याचां दिनांक, याबाबत विविध प्रसारमाध्यमातून जिल्हा स्तरावर व्यापक प्रसिध्दी देवून सदर व्यक्तीचा ठावठिकाणा माहित असल्यास तो कळविण्याचे आवाहन करण्यात यावे.तसेच अशा व्यक्तींचा तपशील राज्य नियंत्रण कक्षासही पाठविण्यात यावा.<br>४) त्याच बरोबरीने प्रत्यक्ष करोनाग्रस्त असलेल्या व आज दवाखान्यात उपचार घेत असलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांशी संपर्क साधून त्यांनी विविध ठिकाणी दिलेल्या भेटी व त्यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्ती यांचे सर्व्हेक्षण करावे व त्यांचीही वैद्यकीय पथकाव्दारे स्क्रिनिंग करावी. लक्षणे आढळल्यास तात्काळ तहसिलदार व तालुक्यातील आरोग्य यंत्रणेस कळवावे व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल या कार्यालयास तीन दिवसात सादर करावा. या कार्यासाठी संदर्भ क्र.५ व्दारे या कार्यालयाच्या आदेशाव्दारे वार्डनिहाय व गावनिहाय समिती स्थापन करणेबाबत कळविले होते अर्थातच आपण त्यानुषंगाने कार्यवाही केली असेलच सदर समितीच्या मदतीने सदर सर्वेक्षण कार्य तात्काळ पार पाडावे. नोडल ऑफीसरने दररोज न चुकता अहवाल सादर करावा व पुढील तीन दिवसात कामकाज संपेल असे नियोजन करावे.<br>५) मा. जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी दिलेले आदेशांचे पालन करावे |
| | १) श्री विशाल दौंडकर तहसिलदार (महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय रायगड. | १)इमिग्रेशन ब्युरो मुंबई व जवळच्या विमानतळावरुन दि.१ मार्च २०२० पासून परदेशातून प्रवास करुन रायगड जिल्हयात आलेल्या प्रवाशांची माहिती (नाव, पत्ता, मोबाईल नंबर इ.) जिल्हा पोलिस अधिक्षक व मा. पोलीस आयुक्त, यांच्या मदतीने व आय.डी.एस.पी. (I.D.S.P.) यांच्या मदतीने संकलीत करणे व तालुकानिहाय संबधित उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांना विवरणपत्र-१ प्रमाणे कळविणे. वेळोवेळी लागणारी माहिती Provide करणे व उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांचेकडून सदर Data संकलित करणे. विवरणपत्र २ व ३ बनविणे.<br>२) मा. जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी दिलेले आदेशांचे पालन करावे |